दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com



दिवा न्यूज

आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरु..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



▶ वर्ष-२ ■ अंक-४२ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १५ मे २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# भविष्यात पार्किंग समस्या गंभीर होण्याची शक्यता

## दिवा शहरात पालिकेची एकही पार्किंग सुविधा उपलब्ध नाही!

**शहराला पार्किंग शिस्त लावण्यासाठी पालिका प्रशासनाने आताच मुख्य रस्त्यांच्या बाजूने पे अँड पार्क सुविधा उपलब्ध करावी**

▶ दिवा न्यूज विशेष

**दिवा:- शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असताना शहरात वाहनांची संख्या देखील वाढत आहे. ठाणे महानगरपालिका प्रशासनाने दिवा शहरासाठी आतापासूनच पार्किंग धोरण राबवण्याची गरज निर्माण झाली आहे.**

सध्या दिवा शहरातील प्रमुख रस्त्यांवर फेरीवाल्यांचे अतिक्रमण असल्याने रस्त्याच्या बाजूला कुठेही पार्किंग उपलब्ध असलेले दिसत नाही. दिवा शहराला शिस्त लागण्यासाठी पालिका प्रशासनाने शहरात लक्ष घालणे गरजेचे आहे. शहरात पे अँड पार्क साठी पालिकेमार्फत कोणतीही व्यवस्था नाही.दुसरीकडे दिवा शहरातील इमारतींना पार्किंग व्यवस्था उपलब्ध नाही. परिणामी नागरिक भेटेल त्या ठिकाणी आपल्या गाड्या पार्क करत असतात. यामुळे अनेक वेळा गाड्यांचे नुकसान होणं,त्याचबरोबर वाहतुकीत अडथळा येणे अशा प्रकारच्या गोष्टी होत असतात.

भविष्यातील पार्किंग समस्येचा प्रश्न लक्षात घेऊन संबंधित विभागाने दिवा शहरातील प्रमुख रस्त्यांचे सर्वे क्षण करून या रस्त्यांवर एका बाजूने पे अँड पार्क सुविधा आतापासूनच सुरू करून शहराला एक शिस्त लावावी अशी मागणी वाहन चालकांकडून होत आहे. दिवा शहरातील इमारतींना चाळींना पार्किंग सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांची वाहने ही रस्त्यावरच पार्क करावी लागतात.परंतु फेरीवाल्यांचा रस्त्यावर असणारा कब्जा यामुळे वाहन पार्किंग करण्यास अनेक वाहन चालकांना अडथळे येतात. महापालिकेने मुख्य रस्त्यांवरील काही भाग हे वाहन पार्किंगसाठी पे अँड पार्क पद्धतीने उपलब्ध करून दिल्यास त्याचा फायदा दिवा शहरातील वाहन चालकाना होईल. भविष्यातील गंभीर प्रश्न टाळण्यासाठी प्रशासनाने आताच लक्ष दिल्यास हा प्रश्न काही प्रमाणात सुटण्यास मदत होईल.

# सगळे नाले ९०% नव्हे तर १००% साफ झाले पाहिजेत

**कामात कोणतीही हयगय नको**

**महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी केली नाले सफाईची पाहणी**





**ठाणे : नाले सफाईच्या कामात कोणतीही हयगय नको. सगळे नाले ९० टक्के नव्हे तर १०० टक्के साफ झाले पाहिजेत, हेच डोक्यात ठेवून काम करावे, अशा स्पष्ट सूचना महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागास दिल्या आहेत.**

आयुक्त बांगर यांनी गुरूवारी नाले सफाईच्या कामाची पाहणी केली. ज्ञानसाधना महाविद्यालय, किसन नगर, इंदिरा नगर - साठे नगर, कापूरबावडी, पातलीपाडा येथील नाले सफाईचा आढावा घेतला. ज्ञानसाधना महाविद्यालयाच्यापाठी रेल्वे मार्गालगत असलेल्या नाल्यातून गाळ उपसण्याचे काम पोलकेन मशीनच्या मदतीने सुरू आहे.

रेल्वे मार्गाखाली असलेल्या नाल्यात मशीन जाणे शक्य नाही. तेथे मनुष्यबळाचा वापर करून गाळ साफ केला जाईल, याची दक्षता घ्यावी. कल्व्हर्ट खालील गाळ काढला नाही, तर त्याच्या अलिकडच्या भागातील नाले सफाईची उपयुक्तता शून्य राहील, असेही आयुक्त बांगर यांनी नमूद केले.

नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा असून त्यांची सफाई हे मोठे आव्हान आहे. पावसाळ्यापूर्वी सर्व नाले साफ होतील, तसेच वेळोवेळी त्यांची सफाई केली जाईल. तसेच, अतिवृष्टीच्या काळात अधिक लक्ष ठेवले जाईल याची दक्षता घेण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

(पान ५ वर)

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, १५ मे २०२३


# कर्नाटकमधील ऐतिहासिक प्रतिसाद
## ठाण्यात काँग्रेस कार्यकर्त्यांनी केला जल्लोष

**ठाणे:** कर्नाटकमध्ये काँग्रेसला मिळत असलेल्या ऐतिहासिक प्रतिसादमुळे ठाणे काँग्रेसच्या वतीने शनिवारी दुपारी ठाणे काँग्रेस कार्यालयाबाहेर एकच जल्लोश केला. यावेळी ढोल ताशांचा गजर करत फटाके फोडून काँग्रेस कार्यकर्त्यांनी आपला आनंद व्यक्त केला. यावेळी ठाणे काँग्रेस (जिल्हा)शहराध्यक्ष ॲड.विक्रांत चव्हाण,शहर काँग्रेस प्रवक्ते सचिन शिंदे,महिला अध्यक्षा वैशाली भोसले यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली.

दरम्यान, यावेळी शहराध्यक्षांच्या हाती गदा दिसली. तसेच डरो मत अशा आशयाचे आणि राहुल गांधी यांचे छायाचित्र असलेले फलक कार्यकर्त्यांच्या हाती दिसत होते.

यावेळी शहराध्यक्ष चव्हाण यांनी बोलताना सांगितले, की भाजपा सरकारने आपल्या सत्तेचा गैरवापर करून कर्नाटकातील काँग्रेस व विरोधी पक्षनेत्यांवर सुडबुद्धीने विविध कारवाई केल्या. त्यामुळे कर्नाटक जनतेने त्यांना त्याची खरी जागा दाखवून दिली. पंतप्रधान फक्त 'मन की बात' करीत राहीले, 'जन की बात' मात्र करीत नव्हते. परंतु काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी कायम जनतेमध्ये जाऊन 'जन की बात' ऐकत होते त्याचे प्रश्न समजावून घेत होते,भाजपा करित असलेले जातीयवादी विचार कर्नाटक जनतेने उधळून लावले व सर्व धर्म समभाव चा नारा देणाऱ्या काँग्रेसला साथ दिली असे शेवटी सांगितले.

## शॉर्टसर्किटने वॉशिंग मशिनला आग

**ठाणे:** रामचंद्र नगर या ठिकाणी असलेल्या नवनीत सोसायटी या ०५ मजली इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील स्वाती चव्हाण यांच्या मालकीच्या या रूममध्ये शॉर्टसर्किट होऊन डोअर बेल व वॉशिंग मशिनला आग लागल्याची घटना शनिवारी सकाळी सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास समोर आली. ही आग जवळ पाऊण तासांनी नियंत्रणात आली. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसून बेल आणि मशीनचे नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी महावितरण विद्युत कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली होती.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.



## ठाण्यात मीटर बॉक्स रूममध्ये आग
### ८ मीटर बॉक्स जळून खाक

**ठाणे:** पाचपाखाडी, ओपन हाऊस, या ठिकाणी असलेल्या श्रीपाल कॉम्प्लेक्स या ०३ मजली इमारतीच्या तळ मजल्यावरील मीटर बॉक्स रूममध्ये आग लागल्याची घटना शनिवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास समोर आली. ही आग जवळपास अर्ध्या तासाने नियंत्रणात आणण्यात यश आले. पण, या घटनेत ८ मीटर बॉक्स जळून खाक झाले आहे. तर यामध्ये सुदैवाने कोणालाही दुखापत झालेली नाही. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी महावितरण विद्युत कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली होती.



## ठाण्यात सिमेंट मिक्सर ट्रक उलटला; अपघातानंतर वाहनचालकाचे पलायन

**ठाणे:** हिरानंदानी इस्टेट येथुन कापूरबावडीकडे जाताना, रिकामा सिमेंट मिक्सर ट्रक चालकाचा ट्रक वरील ताबा सुटून उलटल्याची घटना मंगळवारी पहाटे पावणे सहा वाजण्याच्या सुमारास घडली. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसून चालक गाडी सोडून तेथून पळून गेला. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी कापूरबावडी पोलीस व वाहतूक पोलीस २- क्रेन मशीनसह व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१- पिकअप वाहनासह दाखल झाले. रस्त्यावरती उलटलेल्या ट्रकला शहर वाहतूक पोलीस कर्मचारी यांच्याकडून २ क्रेन मशीनच्या सहाय्याने सरळ करून तो रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करून देण्यात आला. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## वेश्याव्यवसाय करणाऱ्या दलाल महिलेला अटक
### एका महिलेची सुटका

**ठाणे:** ठाणे परिसरात मुलींकडुन वेश्याव्यवसाय करून घेणाऱ्या एका दलाल महिलेस ठाणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक केली. तसेच तिच्या तावडीतून एका बळित महिलेची सुटका करण्यात पोलिसांना यश आले. ठाणे शहर परिसरात पिडीत असहाय्य मुलींना फुस लावुन वेश्यागमनासाठी तयार करून वेगवेगळ्या ठिकाणी पाठविले जाते. अशी माहिती ठाणे गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडील पोलीस पथकास मिळावी होती. त्यानुसार पोलीस पथकाने छापा टाकून एका महिला दलाल हिला ताब्यात घेऊन एका महिलेची सुटका केली. ही कारवाई ठाणे गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या पथकाने ठाणे एसटी डेपो गेटच्या शेजारी केली. याप्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**






मा. उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना शाखा तिसाई नगर येथे शाखाप्रमुख निलेश म्हात्रे यांनी दिव्यांग सहाय्य शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात दिव्यातील अनेक भागातील दिव्यांगानी सहभाग घेतला. या शिबिरात दिव्यांगांना मोफत कृत्रिम अवयव, साहित्य वाटप, जयपुर फूट, व्हील चेअरचे मोफत वाटप करण्यात आले. याप्रसंगी शिबिरात माजी नगरसेविका दर्शना चरणदास म्हात्रे, शशिकांत पाटील व चरणदास म्हात्रे आणि पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अर्चना पाटील यांच्या वतीने सामाजिक उपक्रमातून रमाकांत मढवी यांचा वाढदिवस साजरा

दिवा:- शिवसेना दिवा शहरप्रमुख,ठाणे महानगरपालिकाचे कार्यसम्राट माजी उपमहापौर श्री.रमाकांत मढवी यांच्या वाढदिवसा निमित्ताने सामाजिक कार्यकर्त्या सौ.अर्चना निलेश पाटील व सौ.भाग्यश्री गुरुनाथ पाटील यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना मोफत शालेय वस्तु वाटप करण्यात आले.यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.








# मंत्री रविंद्र चव्हाण यांनी घेतला ठाण्यातील समस्यांचा आढावा



जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक, भाजपा कार्यकर्त्यांबरोबर संवाद

**ठाणे :** राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी शुक्रवारी ठाणे शहराचा दौरा करून शहरातील समस्यांचा आढावा घेतला. त्याचबरोबर भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांबरोबर संवाद साधला. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष बैठक घेऊन विविध समस्यांसंदर्भात योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश महापालिका व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

भाजपाकडून दोन जिल्ह्यांची जबाबदारी मंत्र्यांना देण्यात आली आहे. त्यानुसार ठाणे शहर जिल्ह्याचा सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी शुक्रवारी दौरा केला. ठाणे शहर भाजपाचे अध्यक्ष व आमदार निरंजन डावखरे आणि आमदार संजय केळकर यांनी स्वागत केले. त्यानंतर भाजपाच्या खोपट येथील कार्यालयात कोअर कमिटीची बैठक झाली. त्यात पक्षाच्या संघटनात्मक स्थितीबरोबरच ठाण्यातील राजकीय परिस्थितीचाही आढावा घेण्यात आला. या बैठकीला प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, माजी गटनेते मनोहर डुंबरे, माजी नगरसेवक संदीप लेले, शहर सरचिटणीस कैलास म्हात्रे, मनोहर सुखदरे यांचीही उपस्थिती होती.

भाजपाचे मंडल अध्यक्ष व मंडल प्रभारींबरोबर रविंद्र चव्हाण यांनी संवाद साधला. त्यानंतर पक्षाचे माजी नगरसेवक-नगरसेविकांबरोबर चर्चा करून प्रभागातील समस्यांची माहिती घेतली. तसेच त्या सोडविण्याचे आश्वासन दिले. भाजपाचे बूथ प्रमुख बिपीन गहलोत यांच्या खारटन रोड येथील बूथबाबत बैठक घेतली.

# ठाणे मध्यवर्ती कारागृह परिसरातील १० बांधकाम प्रस्तावांना परवानगी

**ऑगस्ट २०१७ नंतर समितीची प्रथमच झाली बैठक**

**ठाणे : ठाणे मध्यवर्ती कारागृहाच्या सभोवताली १५० मीटरच्या परिक्षेत्रातील बांधकाम आणि दुरुस्ती यांच्या १० प्रस्तावांना मंगळवारी मान्यता देण्यात आली. त्यामुळे, तेथील नागरिकांच्या बांधकाम आणि दुरुस्तीच्या कामांना गती मिळणार आहे.**

ठाणे मध्यवर्ती कारागृहाच्या बाह्य तट भिंतीपासून १५० मीटर परिघ क्षेत्रातील बांधकामास परवानगी देताना २० मीटरचे बफर क्षेत्राची निर्मिती सुलभ होईल. तसेच, कारागृहाच्या संवेदनशील भागातील थेट दृश्यमानतेमुळे कोणताही धोका निर्माण होणार नाही, याची खात्री करून त्याबद्दल सल्ला देण्याची जबाबदारी स्थायी सल्लागार समितीवर देण्यात आली आहे. त्यासाठी, गृह विभागाच्या निर्देशानुसार कारागृह आणि महापालिका यांची एक स्थायी सल्लागार समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीची बैठक समितीचे अध्यक्ष आणि ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत, शहर विकास विभागाने एकूण १० प्रस्ताव सादर केले. त्यात, पुनर्विकास, नवीन बांधकाम, चर्चची दुरुस्ती, शाळेच्या विस्तारित इमारतीचे बांधकाम आदी प्रस्तावांचा समावेश होता. ऑगस्ट २०१७ नंतर या समितीची प्रथमच बैठक झाली. त्यामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या बांधकाम प्रकल्पांना चालना मिळाली आहे. तसेच, धोकादायक स्थितीतील इमारतींमधील रहिवाशांना दिलासा मिळाला आहे.

या प्रस्तावांनुसार पाहणी करण्यासाठी गठीत केलेल्या पथकामार्फत सर्व प्रस्तावित बांधकामांच्या ठिकाणी भेट देवून त्याची माहिती घेण्यात आली. तसेच, ड्रोनद्वारे परिसराचे चित्रीकरण करण्यात आले. इमारतींच्या प्रस्तावित उंचीवरून कारागृहाच्या कोणत्या भागापर्यंत पाहता येते, याचा अभ्यास करण्यात आला. ही सगळी माहिती बैठकीत प्रस्तावनिहाय सादर करण्यात आली. त्यानंतर समितीने एकेका प्रस्तावाचा विचार करून सर्व प्रस्तावांना नियम आणि अटींचे बंधन घालून एकमताने मान्यता दिली.

प्रस्तावित बांधकामाचे कारागृहापासूनचे अंतर, 'डेड वॉल'बद्दलचे नियम, छताच्या उतरणीचे काम आणि छतावर प्रवेश बंदी या नियमांचे काटेकोर पालन झाले की नाही हे पाहूनच या बांधकामांना निवास प्रमाणपत्र देण्यात यावे. यात कोणतीही कसूर नको, असे समितीचे अध्यक्ष आणि महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी स्पष्ट केले. त्याच बरोबर, या समितीच्या बैठकीत मंजूर केलेल्या प्रस्तावांच्या बांधकामात अटींचा भंग झाल्याचे कारागृह अधीक्षक यांना दिसले तर त्यांनी तसे महापालिकेस कळवावे. त्यानुसार कारवाई केली जाईल, असेही आयुक्त बांगर यांनी सांगितले.

या बैठकीस कारागृह उपमहानिरीक्षक योगेश देसाई, पोलीस आयुक्त, ठाणे यांचे प्रतिनिधी सहाय्यक पोलीस आयुक्त विलास शिंदे हे सदस्य तसेच, कारागृह अधीक्षक हर्षद अहिरराव, सहाय्यक संचालक नगररचना सतीश उगीले, शहर विकास विभागाचे उप नगर अभियंता नितीन येसुगडे, कार्यकारी अभियंता देवेंद्र नेर आदी अधिकारी उपस्थित होते.

# ठाणे महापालिकेची १०० कोटींची भरारी

## आर्थिक वर्षाच्या पहिल्या ४० दिवसात नागरिकांनी केला मालमत्ता कराचा विक्रमी भरणा

***ठाणे : मालमत्ता कराच्या विक्रमी वसुलीचा ओघ कायम ठेवत ठाणे महापालिकेने आर्थिक वर्षाच्या पहिल्या ४० दिवसात तब्बल १०० कोटी रुपयांची मालमत्ता कर वसुली केली आहे. ठाणेकरांनी मालमत्ता कर भरणा करण्यास दिलेला अभूतपूर्व प्रतिसाद प्रशंसनीय असल्याचे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी नमूद केले आहे.***

गेल्या आर्थिक वर्षात ७२२ कोटी रुपयांचा विक्रमी मालमत्ता कर गोळा केल्यानंतर, ठाणे महापालिकेने चालू (२०२३-२४) आर्थिक वर्षाची देयके ०१ एप्रिलपासून करदात्यांना पाठविण्यास सुरूवात केली. मोबाईलवर पाठविण्यात आलेल्या या संदेशाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ठामपाच्या मालमत्ता कर विभागास यावर्षी सुमारे १००० कोटी रुपयांच्या कर वसुलीचे लक्ष्य आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले आहे. त्यानुसार, नागरिकांमध्ये जागृती करून दिलेले लक्ष्य पूर्ण करण्यासाठी आतापासूनच कंबर कसली आहे.

गेल्या वर्षी १० मेपर्यंत ११.४६ कोटी रुपयांचा कर भरणा झाला होता. या वर्षी ही रक्कम १००.८५ कोटींच्या घरात पोहोचली आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत दहा पट वाढ झाली आहे. तोच कल




मालमत्ताधारकांच्या संख्येबाबतही आहे. गेल्या वर्षी या काळापर्यंत ६४१५ मालमत्ताधारकांनी कर भरला होता. ती संख्या यावेळी ७४ हजार ९०८ एवढी आहे. कर दात्यांपैकी ५१.२५ टक्के नागरिकांनी कर भरणा करण्यासाठी ऑनलाईन सुविधेचा लाभ घेतला आहे. तर, ३३ टक्के कर दात्यांनी धनादेशाद्वारे कर भरणा केला आहे. रोख रकमेने कर भरणा करण्याचे प्रमाण आता ८.८० टक्क्यांवर आले आहे. तसेच, सर्वाधिक ३६.१९ कोटी रुपयांचा कर भरणा माजीवडा -मानपाडा क्षेत्रात झाला आहे. तर सर्वात कमी २.५४ कोटी रुपयांचा कर भरणा मुंब्रा भागात आहे. ऑनलाईन कर भरणा करण्यासाठी प्रोत्साहन देतानाच ऑनलाईन कर भरणारे आणि ऑफलाईन कर भरणा करणारे यांच्याकडून प्रक्रियेबद्दलचा प्रतिसाद नोंदवून घ्यावा म्हणजे आपल्या यंत्रणेत तसे बदल करता येतील, अशा सूचना आयुक्त बांगर यांनी मालमत्ता कर विभागाचे उपायुक्त जी. जी. गोदेपुरे यांना दिल्या आहेत.यापूर्वी, मालमत्ता धारकांना मे महिन्याच्या अखेरपर्यंत देयके पाठवली जात होती. नवीन आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी देयक ऑनलाईन भरण्याची लिंक एसएमएसद्वारे उपलब्ध झाली.

# ठाण्यात क्षयरोग वाढतोय

## ४ महिन्यात आढळले अडीच हजार रुग्ण

ठाणे: ठाणे शहरामधील दाटीवाटीने राहणाऱ्या झोपडपट्टीत क्षयरोग वाढत आहे. गतवर्षी ठाणे महापालिका हद्दीत क्षयरोगाचर ८०६० रुग्ण आढळून आले असून त्यामध्ये महिलांचे प्रमाण हे पुरुष रुग्णांपेक्षा दुपट्टीने जास्त आहे. तसेच ४ तृतीय पंथीय ही या आजाराने ग्रस्त असल्याचे समोर आले आहे. तसेच या चालू वर्षात म्हणजे चार महिन्यात २ हजार ५०० क्षयरोगाचे रुग्ण नव्याने आढळून आले आहेत. ठाण्यात क्षयरोगाने (टीबी) गंभीर स्वरूप धारण केले आहे. तर क्षयरोग नियंत्रण विभागाकडून नवीन क्षयरुग्णांची ओळख पटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. तसेच आढळून आलेल्या सर्वच रुग्णांवर उपचार सुरू आहे.

ठाणे महानगरपालिकेचे क्षयरोग अधिकारी डॉ.प्रसाद पाटील म्हणाले की, केंद्र सरकारने २०२५ पर्यंत देश क्षयरोगमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. याअंतर्गत कोरोनाच्या काळात क्षयरुग्ण शोधण्याची मोहीम ठाण्याने सुरू ठेवली होती ती आताही सुरूच आहे. याशिवाय उपचार अर्धवट सोडणाऱ्या रुग्णांचा शोध घेण्याची मोहीमही सुरू करण्यात आली असून, त्यांना रु.



डॉ. प्रसाद पाटील यांच्या मते, जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ दरम्यान ८०६० रुग्ण आढळले. ज्यामध्ये दृढ क्षयरोग रुग्णांची संख्या १२०० आहे आणि प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या ६८६० आहे.

क्षयरोग रुग्णांच्या उपचारासाठी सरकारकडून बीडीक्यू नावाची गोळी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. जे अधिक महाग आहे. त्याचा उपचार सहा महिने चालतो. या औषधाची किंमत प्रति रुग्ण सुमारे दहा लाख रुपये आहे. हा संपूर्ण खर्च महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून केला जात असला तरी केंद्र आणि राज्य सरकारमार्फत केला जातो. खासगी लॅबमध्येही या रुग्णांची मोफत तपासणी केली जाते. केंद्र आणि राज्य सरकारकडूनही निधी दिला जातो. रोगप्रतिकारक शक्तीचा अभाव, कॉमोरबिडीटी, म्हातारपण, शस्त्रक्रिया केलेले रुग्ण, खराब आहार, योग्य झोप न लागणे यामुळे टीबीचा संसर्ग होऊ शकतो. नागरिकांनी योग्य निदान करून लक्षणे जाणवल्यानंतर औषध घेतल्यास रुग्ण बरा होतो. नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.

## महाराष्ट्रात उकाडा वाढला



**ठाणे** महाराष्ट्रात सुरु असणाऱ्या अवकाळीच्या सत्रानं मागील काही दिवसांपासून नागरिक आणि शेतकऱ्यांपुढे अनेक अडचणी उभ्या केल्या. ऐन मे महिन्यात सुरु असणाऱ्या या अवकाळीमुळं शेतपिकांचं नुकसान तर झालंच. शिवाय मान्सूनही लांबणार का असे प्रश्नही उपस्थित करण्यात आले. प्रत्यक्षात मात्र काही वेगळीच परिस्थिती पाहायला मिळत आहे. कारण, मुंबई, पुण, कोकण किनारपट्टी आणि राज्याच्या उर्वरित भागामध्ये उष्णतेचा दाह वाढू लागला.

काही भागांमध्ये आर्द्रतेचं प्रमाण जास्त असल्यामुळं तापमान दोन अंशांनी जास्त असल्याचं मागील दोन दिवसांमध्ये जाणवलं. थोडक्यात राज्याच्या काही भागांमध्ये पुन्हा एकदा तापमान वाढील सुरुवात झाली असून, पुण्यात हा आकडा ४० अंशांच्या वर राहील. तर, मुंबईमध्ये ३६ ते ३८ अंश सेल्सिअसदरम्यान राहील.

## सगळे नाले ९०% नव्हे तर १००% साफ झाले पाहिजेत

(पान १ वरून)

किसन नगर येथील पाहणी दरम्यान नाल्यातील झुडपे हटविण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. या झुडपांमध्ये कचरा अडकून तो नाल्याचा प्रवाह बाधित करतो. त्यामुळे जसा नाल्यातील गाळ काढला जातो आहे, तसेच ही झुडपे आणि इतर अडथळे दूर करण्यास आयुक्त बांगर यांनी सांगितले.

इंदिरा नगर, साठे नगर या भागातील नाले सफाईची पाहणी केल्यावर आयुक्तांनी नाल्यावरील जाळ्यांबद्दल अधिकाऱ्यांशी चर्चा केली. नाल्याच्या दोन्ही बाजूंना सहा फुटांपर्यंत जाळ्या बसवल्या तर नागरिकांकडून कचरा टाकण्याचे प्रमाण कमी होईल. तर काही ठिकाणी नाल्या शेजारी दुमजली बांधकामे आहेत. अशा ठिकाणी नाल्यांवर कमानीच्या आकाराच्या जाळ्या बसवता येतील का याची पाहणी करून प्रायोगिक तत्वावर एका नाल्यावर काम सुरू करण्यास आयुक्त बांगर यांनी सांगितले. या जाळ्या बसवताना त्यांची सफाई करणे सुलभ होईल अशी रचना ठेवावी, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

कापूरबावडी आणि पातली पाडा येथे पाहणी दरम्यान वीज वाहिन्यांबद्दल विशेष काळजी घेण्याची सूचना आयुक्तांनी केली. कामगारांच्या सुरक्षेची पूर्ण काळजी घेवून काम व्हावे, असे आयुक्त बांगर म्हणाले. जेथे वीज वाहिन्या आहेत तिथे महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीतच नाले सफाईचे काम करावे, असेही आयुक्तांनी सांगितले. तसेच, रस्त्यावर काढून ठेवलेला गाळ जास्तीत जास्त ४८ तासांच्या आत उचलला जाईल याची खबरदारी घेण्याची सूचना दिली.

### रेल्वेसोबत बैठक

मान्सून पूर्व आढावा घेण्यासाठी मध्य रेल्वे सोबत बैठक आयोजित करण्यात येणार आहे. त्यात, मुलुंड ते दिवा भागातील रेल्वे मार्गाखालील नाले सफाईचा कालबध्द कार्यक्रम, तसेच, ठाणे रेल्वे स्टेशन परिसरातील पाणी साठण्याच्या जागा यांच्यावर उपाय योजनांची आखणी केली जाईल, अशी माहिती आयुक्त बांगर यांनी दिली.

## अतिधोकादायक इमारती तातडीने रिकाम्या करण्याची कार्यवाही करावी

### – जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात धोकादायक इमारती पडून दुर्घटना होऊ नये, यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक नियोजन प्राधिकरणांनी धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करून त्या इमारती रिकाम्या कराव्या. तसेच अशा इमारतींमधील रहिवाशांना पर्यायी ठिकाणी हलवून इमारत निष्कासित करण्याची कार्यवाही करावी. तसेच दर्जाहिन बांधकाम असलेल्या इमारती आणि अनधिकृत इमारतींचीही तपासणी करावी,असे निर्देश सोमवारी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिले.

धोकादायक इमारती पडून दुर्घटना होऊ नये, यासाठी इमारतींचे सक्षमतेचे लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करणे, अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांची पर्यायी व्यवस्था करणे या व इतर उपाययोजनासंदर्भात जिल्हाधिकारी शिनगारे यांनी जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, मुंबई महानगर विकास प्राधिकरणा आदी विविध यंत्रणांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी, तहसीलदार रेवण लेंभे यांच्यासह विविध महानगरपालिका, नगरपालिकांचे अधिकारी उपस्थित होते.

इमारती पडून जिवित हानी घडू नये, यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने सर्व संबंधित नियोजन प्राधिकरणांना नगरविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, ३० वर्षे जुन्या इमारतींचे सक्षमतेचे लेखापरिक्षण (स्ट्रक्टचरल ऑडिट) करून धोकादायक इमारतींची यादी तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांना त्या इमारतींमधून इतर ठिकाणी स्थलांतरित करून ती इमारत निष्कासित करण्यात यावे. यासंदर्भात कृती आराखडा तयार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा प्रशासनाकडे सादर करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी शिनगारे यांनी दिले.

धोकादायक व अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांची भाडेतत्वावरील घर योजनेमध्ये किंवा इतर योजनांमधील रिकाम्या घरांमध्ये पर्यायी व्यवस्था करून स्थलांतरित करण्यात यावे. यासाठी एमएमआरडीएने सहकार्य करावे. तसेच धोकादायक इमारतींसंदर्भात महापालिकांनी त्यांच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी शिनगारे यांनी वेळी दिल्या.

एमएमआरडीए प्राधिकरण असलेल्या भागातील धोकादायक इमारतींच्या सर्वेक्षणासाठी पथक तयार करावे. जिल्ह्यात धोकादायक इमारती कोसळून कोणतीही जिवित हानी होऊ नये, यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, प्रत्येक प्राधिकरणाने यासंदर्भात दक्ष राहून कार्यवाही करावी,असे निर्देशही शिनगारे यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यातील ज्या इमारतींना ३० वर्षे पूर्ण झाल्या नाहीत परंतु त्यांच्या बांधकामांचा दर्जा निकृष्ट आहे अशा इमारती तसेच परवानगी नसलेल्या, अनधिकृतपणे बांधलेल्या इमारतींचाही स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे, असेही परदेशी यांनी यावेळी सांगितले.

# शेतकऱ्यांचे सरासरी उत्पन्न वाढविण्यासाठी आराखडा तयार करावा –पालकमंत्री शंभूराज देसाई

**ठाणे:** जिल्ह्यात भात वरी पिकांबरोबरच सोनचाफा, हळदी, भेंडी पिकाचे क्षेत्र वाढविण्यासाठी नियोजन करावे. शेतकऱ्यांचे सरासरी उत्पन्न वाढावे, यासाठी आराखडा तयार करावा. तसेच खरीप हंगामात खते, बियाणे, पिककर्ज पुरवठा सुरळीत होईल याची दक्षता घेण्याचे निर्देश राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी मंगळवारी येथे दिले. याचदरम्यान त्यांनी एक रुपयात पिक विमा या योजनेपासून जिल्ह्यातील एकही शेतकरी वंचित राहता कामा नये, याची दक्षता घ्यावी. असेही सांगितले. याशिवाय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे जिल्ह्यात सोनचाफा फुलाचे क्षेत्र वाढविण्याचे निर्देश दिले आहे. त्याप्रमाणे हे क्षेत्र वाढविण्यासाठी जिल्हा कृषि विभागाने आराखडा तयार करावा. असे म्हटले आहे.

पालकमंत्री देसाई यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक झाली. त्यावेळी पालकमंत्री हे दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून बोलत होते. आमदार किसन कथोरे हे दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. आमदार शांताराम मोरे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दीपक कुटे, जिल्हा परिषदेच्या कृषी अधिकारी सारिका शेलार, यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीस उपस्थित होते.

जिल्हा कृषि विभागाने केलेल्या खरीप हंगामा २०२३ च्या नियोजनाचा आढावा घेऊन पालकमंत्री देसाई म्हणाले की, जिल्ह्यातील लागवडी योग्य क्षेत्र दुप्पटीने वाढविण्यासाठी कृषि विभागाने नियोजन करावे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कृषि पतपुरवठा मिळावा, याकडेही लक्ष द्यावे. ग्रामीण भागातील भाजीपाला तसेच महिला बचत गटांच्या उत्पादनांना शहरी भागात मोक्याच्या जागी तसेच ठाणे जिल्ह्यातील विविध मॉलमध्ये जागा मिळावी, यासाठी आराखडा तयार करावा. महानगरपालिकांच्या क्षेत्रात महिला बचत गटांच्या उत्पादनाच्या विक्रीसाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व महानगरपालिकांच्या आयुक्तांची बैठक घेऊन सूचना देऊ, असेही पालकमंत्री देसाई यांनी यावेळी सांगितले.

जिल्ह्यात आंबा पिकाऐवजी फणस, काजू, हळद या पिकांचे क्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. तसेच शेतकऱ्यांचा भाजीपाला विक्रीसाठी शहरी भागात जागा उपलब्ध करून दिल्यास नागरिकांना ताजा भाजीपाला मिळेल व शेतकऱ्यांच्या मालाला रास्त किमतही मिळेल. असे आमदार किसन कथोरे यांनी सांगितले. आमदार मोरे यांनीही नागली, वरई व बांधावरील तूरच्या उत्पादनावर भर देण्याची सूचना केली.

जिल्हाधिकारी शिनगारे यांनी सांगितले की, जिल्ह्यात भात व नागली या पिकांबरोबरच हळद, सोनचाफा फुलांच्या उत्पादन वाढीवर भर देण्यात येत आहे. तसेच भात पिकाचे सरासरी उत्पादन वाढविण्यावर कृषि विभाग भर देत आहे. २०२२ मध्ये भात उत्पादकतेमध्ये सरासरी २३ टक्के वाढ झाली आहे. यंदा सन २०२३-२४मध्ये एकूण ५६ हजार हेक्टर क्षेत्रावर भात पेरणीचे लक्षांक ठेवले असून २७०० किलो प्रति हेक्टर उत्पादनाचे लक्ष ठेवले आहे. तर जिल्ह्यात नाचणी पिकाची सरासरी उत्पादकता ९४९ किलो प्रति हेक्टर एवढी असून खरीप हंगाम २०२२ मध्ये ११३८.१२ किलो प्रति हेक्टर उत्पादकता होती.

# राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालयाच्या वसतीगृहाचे नूतनीकरण चार महिन्यात पूर्ण करा



**ठाणे :**ठाणे महापालिकेच्या राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालयात शिकणाऱ्या आणि छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात प्रशिक्षण घेणाऱ्या निवासी डॉक्टरांच्या वसतीगृहाचे नूतनीकरण चार महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निवासी डॉक्टरांच्या वसतीगृहांच्या सुधारणेबाबत ठाणे महापालिकेस आदेश दिले आहेत. निवासी डॉक्टरांना सर्वोच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच, त्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची तत्काळ अमलबजावणी केली जावी, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. त्याच्या नियोजनासाठी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी सोमवारी निवासी डॉक्टरांच्या रुग्णालय परिसरातील तिन्ही वसतीगृहांची पाहणी केली. निवासी डॉक्टरांचे कॅन्टीन, व्यायामशाळा, खेळाच्या सुविधा आदींचे अवलोकन केल्यावर संबंधितांची बैठक घेतली.

सध्या कॅन्टीनच्या वर असलेल्या वसतीगृहाच्या मुख्य इमारतीमध्ये ७८ आणि रुग्णालयाच्या मुख्य इमारतीमधील वसतीगृह क्रमांक ०८ मध्ये २८ निवासी डॉक्टर राहतात. त्यापैकी वसतीगृहाच्या मुख्य इमारतीची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती करण्याची गरज आहे. इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिटसह अंतर्गत भागाची दुरुस्ती, स्नानगृह, शौचालय यांची पुरेशी व्यवस्था, खोलीच्या आतील रचना यांच्यात आमूलाग्र बदल करण्याची गरज असल्याचे निरीक्षण आयुक्त बांगर यांनी नोंदवले. या वसतीगृहाच्या इमारतीचे नूतनीकरण करताना त्यात एकूण १०० निवासी डॉक्टरांच्या राहण्याची व्यवस्था केली जावी. तसेच, पुरेसा सूर्यप्रकाश, वायुविजन यासाठी आवश्यक ते बदल केले जावेत. कॉमन रूम, व्यायामशाळा यांची रचना चांगली करावी. प्रवेशद्वारे मोठी आणि कोणत्याही अडथळ्याविना असतील हे पहावे, अशा सूचना आयुक्त श्री. बांगर यांनी दिल्या. सध्याच्या कॅन्टीनच्या स्थितीबद्दल आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली. विशेषत: स्वच्छतेचा अभाव ही दुर्लक्षित करण्याजोगी गोष्ट नाही. त्यामुळे, नवीन रचनेत या सर्व गोष्टींचा विचार केला जावा. तसेच, कॅफेटरिया किंवा खाणावळ (मेस) यापैकी नेमका कोणता पर्याय हवा याबद्दल निवासी डॉक्टरांचे मत जाणून घ्यावे असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. कॅन्टीनच्या एकूण व्यवस्थेबाबत आयुक्त बांगर यांनी विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाचे मतही जाणून घेतले. वसतीगृहाच्यासमोर आणि मागील बाजूस असलेल्या जागेचा वापर निवासी डॉक्टरांना क्रीडा सुविधा देण्यासाठी करावा. त्यांच्याशी चर्चा करून खेळासाठी लागणारी व्यवस्था उभी करावी, असे आयुक्त बांगर म्हणाले. वसतीगृहालगतच्या मोकळ्या जागेत अभ्यास, मनोरंजन यासाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच त्या सेवा कॅन्टीनशी जोडून घ्याव्यात असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

# महापालिका शाळेच्या विद्यार्थ्यांना १५ जूनच्या आधी पुस्तके मिळावीत –आयुक्त बांगर



**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना शाळा सुरू होण्यापूर्वी, १५ जूनच्या आधी क्रमिक पुस्तके मिळायला हवीत, याशिवाय शाळांमधील गणवेशाचा रंग बदलावा,असे निर्देश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी शालेय विभागाला दिले आहेत. महापालिका शाळांमधील गुणवत्ता वाढ, तंत्रज्ञानाचा वापर, गणवेशाचा नवीन रंग, त्याची उपलब्धता आणि शालेय क्रमिक पुस्तकांची उपलब्धता आदी विषयांचा आढावा आयुक्त बांगर यांनी मंगळवारी घेतला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि अनुदानित शाळांतील पहिलीते आठवीच्या विद्यार्थ्यांना राज्य सरकारकडून क्रमिक पुस्तके विनामूल्य दिली जातात. तर, नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना महापालिकाक्रमिक पुस्तके विनामूल्य देते. या संदर्भात, बालभारतीकडील पुस्तकांची उपलब्धता आणि खरेदी या दोन्हीगोष्टी ५ जूनपर्यंत पूर्ण व्हायला पाहिजे. शाळा सुरू झाल्यावर पुस्तके देणे हे महापालिकेचे अपयश असून त्याचा थेट फटका विद्यार्थ्यांना बसतो. याची जाणीव ठेवून शिक्षण विभागाने जलद पावले उचलवीत, असे आयुक्त बांगर यांनी सांगितले. त्याचबरोबर, स्टेशनरीच्या खरेदीसाठी असलेले दर निश्चित करून ते २० मेपर्यंत शाळांमार्फत पालकांना कळवावेत. म्हणजे पालकांना १५जूनच्या आधी त्यांची खरेदी करणे शक्य होईल. तसेच, शाळा सुरू झाल्यावर त्यांची बिलेही शाळांकडे तत्काळ सादर केली जातील. विद्यार्थ्यांकडून बिले आल्यावर ते पैसे लवकरात लवकर त्यांच्या खात्यावर जमा होतील याची दक्षता विभागाने घ्यावी, असेही निर्देश आयुक्तांनी दिले.

# मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते 'शासन आपल्या दारी' अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ

: शासनाच्या विविध योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य शासनातर्फे सुरू करण्यात आलेल्या 'शासन आपल्या दारी' अभियानाचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सातारा जिल्ह्यातील दौलतनगर (मरळी) येथे करण्यात आला. नागरिकांना मोठ्या प्रमाणात शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी हे अभियान अधिक व्यापक करण्यात येईल, असे मुख्यमंत्रीशिंदे यांनी यावेळी सांगितले.

दौलतनगर येथील श्रीमती विजयादेवी देसाई विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय परिसरात आयोजित या कार्यक्रमाला उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे, उद्योगमंत्री उदय सामंत, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्रीशिंदे म्हणाले, नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शासकीय कार्यालयात जावे लागते. त्यामुळे अनेकजण योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. या योजना सुलभपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी 'शासन आपल्या दारी' अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात नागरिकांना याचा लाभ देण्यात येत आहे.

'लेक लाडकी' सारखी योजना प्रथमच सुरू करण्यात आली असून. महिलांना एसटी बस प्रवास भाड्यात सवलत देण्यात आली आहे. या योजना सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात बदल घडवून आणणाऱ्या असल्याने त्यांचा लाभ देण्यासाठी शासन आपल्या दारी आले आहे. प्रशासन नागरिकांपर्यंत पोहोचल्यास जनतेच्या समस्या कळू शकतात. ही योजना अधिकाधिक जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करावात यावा, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले.

शिंदे म्हणाले,शासनाने सर्वसामान्य माणसाच्या हिताचे निर्णय सातत्याने घेतले आहेत. अनेक प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करताना मंत्रिमंडळ बैठकीत ३०० पेक्षा अधिक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. शेतकरी, कष्टकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले. अल्पावधीत २९ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. शेतकऱ्यांना संकटकाळात दिलासा देण्यासाठी एनडीआरएफच्या निकषापेक्षा दुप्पट मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

'नमो शेतकरी' योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ६ हजार रुपये देण्याची तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आली. सामान्य माणसालाही मुख्यमंत्र्याला भेटावेसे वाटते हा विश्वास शासनाविषयी निर्माण झाला आहे. सातारा जिल्ह्यासाठी २ हजार ४५ कोटी रुपयांचा निधी विकासकामांसाठी शासनाने दिला आहे. डोंगरी विकासाच्या २०० कोटी रुपयांच्या प्रस्तावांनाही मान्यता देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.पाटील म्हणाले, अधिकाऱ्यांनी शासनाच्या योजना जनतेला समजावून सांगाव्यात आणि त्यांचा लाभ त्यांना द्यावा या हेतूने 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. शासनाने ७५ वर्षावरील ज्येष्ठांना एसटीचा मोफत प्रवास आणि महिलांना ५० टक्के सवलतीची योजना सुरू केली. याचा मोठ्या प्रमाणात लाभ नागरिकांना झाला. जलयुक्त शिवार योजना नव्याने सुरू करण्यात आली. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत सामान्य शेतकऱ्याला उभे राहता आले. दुधाळ जनावरांचे अनुदान वाढविण्यात आले, सातबारा ऑनलाईन देताना डिजिटल स्वाक्षरीद्वारे उपलब्ध झाला, ६०० रुपये ब्रास दराने वाळू, १०० रुपयात आनंदाचा शिधा अशा अनेक जनकल्याणकारी योजना शासनाने सुरू केल्या आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले. ते म्हणाले, शासकीय अधिकारी हे जनतेचे सेवक आहेत. 'शासन आपल्या दारी' अभियानाच्या माध्यमातून वरिष्ठ अधिकारी शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी जनतेच्या दारात जात आहेत. नागरिकांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी व्यापक प्रयत्न करण्यात येत आहेत.



# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत ६० कोटींचा निधी वितरित

**मुंबई** :- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत ६० कोटी रुपये इतका निधी शासनाकडून आज दिनांक १२ मे २०२३ रोजी वितरीत करण्यात आलेला आहे. समाज कल्याण आयुक्तालयाकडून हा निधी अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये लवकरच जमा करण्यात येणार आहे.

मागासवर्गीय मुलामुलींना उच्च शिक्षण घणे सुकर व्हावे यासाठी राज्यात मागासवर्गीय मुलामुलींसाठी शासकीय वसतिगृहाची योजना राबविण्यात येते. राज्यात ४४१ ( मुले-२२९ व मुली-२१२) शासकीय वसतिगृहे सुरू असून त्यामधून मोफत निवास, भोजन, शैक्षणिक साहित्य इ. सोयीसुविधा पुरविण्यात येतात.

सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांपैकी इयत्ता ११ वी व १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यवसायिक तसेच बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमामध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात/ शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना भोजन,निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता उपलब्ध करून घेण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेच्या माध्यमातून मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई,ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपुर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रू.६०,०००/- इतर महसुली विभाग शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रू.५१,०००/- व इतर जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रू.४३,०००/- इतकी रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते.

या योजनेअंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी रू.१२६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी या योजनेअंतर्गत रू.१५० कोटी इतकी तरतूद करण्यात आली असून त्यामधून यापूर्वी रू.१५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.आता रू.६० कोटी इतका निधी शासनाकडून दिनांक १२ मे,२०२३ रोजी वितरीत करण्यात आलेला आहे.

# 'नोझल' लसीकरणाला ठाण्यात ज्येष्ठांकडून पाठ

## २५० डोस पैकी १० जणांनी घेतले नोझल डोस

**ठाणे** : राज्यशासनाकडून कोविशिल्ड अथवा कोवॅक्सिनपाठोपाठ आता 'इन्कोव्हॅक' या लसीचे वाटप ठाणे महापालिकेला झाल्यावर २८ एप्रिलपासून त्या लसीकरणाला सुरुवात झाली. तेंव्हापासून आतापर्यंत केवळ १० जणांनी तो डोस देवून लसवंत होण्याचा मान मिळविला आहे. दरम्याम, ही लस प्रामुख्याने ६० वर्षांवरील नागरिकांना प्राधान्याने देण्याच्या सूचना शासनाच्या असल्याने महापालिका प्रशासनाकडून दररोज २०० ते २५० कॉल पहिला आणि दुसरा डोस घेणाऱ्यांना तिसरा डोस घेण्यासाठी यावे, यासाठी आवाहन केले जात आहे.

जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपूर्वी कोरोनाचा संसर्ग वाढल्याने दररोज वाढणाऱ्या रुग्णांसह सक्रिय रुग्णांची वाढत होती. ती संख्या आता कुठे कमी होताना दिसून लागली. त्यातच कोरोना झालेल्या रुग्णांमध्ये मृत्युमुखी पडणारे ६० वर्षांवरील रुग्ण जास्त आहेत. त्यातच मध्यंतरी लसीकरणाकडे नागरिकांनी पाठ फिरवली आहे. त्यांनतर एप्रिल महिन्यात राज्य शासनाने नोझल लस आणली.

पहिल्या टप्प्यात 'इन्कोव्हॅक' या लशीचे अडीचशे डोस ठामपाला पाठविण्यात आले. हा साठा उपलब्ध होताच पालिकेने शहरातील सहा लसीकरण केंद्रात शुक्रवार म्हणजे २८ एप्रिल पासून नोझल लसीकरणाला सुरु केली आहे. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कौसा आरोग्य केंद्र, मानपाडा आरोग्य केंद्र, शिळ आरोग्य केंद्र, सीआर वाडीया आणि लोकमान्यनगर आरोग्य केंद्र या केंद्रांचा समावेश आहे.

त्या केंद्रांवर आतापर्यंत अवघ्या १० जणांना नोझल लस दिली गेल्याची माहिती महापालिका सूत्रांनी दिली. यावरून ज्येष्ठांकडून अक्षरशः लस घेण्यास पाठ फिरविल्याचे बोलले जाऊ लागले आहे.

# वीज बिल पीडी थकबाकीधारकांना तिसरी आणि अंतिम नोटीस जारी

**ठाणे:** कळवा-मुंब्रा-शीळ भागातील वीज बिल पीडी ( कायमस्वरूपी बंद) थकबाकीदाराना टोरंट पॉवरने आता तिसरी अंतिम नोटीस दिली आहे. यानंतर मात्र अनधिकृत वीज वापरणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा कंपनीने दिला आहे.

टोरंट पॉवर कंपनीने कंपनीकडून स्मरणपत्र देऊनही वीज बिलाची थकीत न देणाऱ्या सुमारे सहा हजार वीजधारकांना महावितरण पीडी थकबाकीबाबत तिसरी आणि अंतिम नोटीस जारी केली आहे. हे लोक मीटरशिवाय वीज वापरत आहेत.

टोरेंट पॉवरने या लोकाना गेल्या महिन्यात दुसरी नोटीस पाठवताना सार्वजनिक आवाहन केले होते , ज्यांचे मीटर पीडी (कायमचे डिस्कनेक्ट केलेले) आहेत आणि पीडीच्या थकबाकीबाबत काही शंका किंवा वाद आहेत, असे लोक अरिहंत बिल्डिंग, कल्याण रोड येथील टोरेंट पॉवरच्या कार्यालयाशी संपर्क साधू शकता. शीळ रोड येथे. महावितरणचे अधिकारी या कार्यालयात सोमवार आणि मंगळवारी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत विशेषत: पीडी थकबाकीबाबत भेटण्यासाठी उपलब्ध असतात.

मात्र, आजपर्यंत १०० जणांनी देखील महावितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधलेला नाही. टोरेंट पॉवरने पुन्हा लोकांना आवाहन केले आहे की, पीडीच्या थकबाकीबाबत काही वाद असल्यास लोकांनी त्यांच्या कागदपत्रांसह महावितरणच्या अधिकाऱ्यांना भेटून त्यांच्या तक्रारींचे लवकरात लवकर निराकरण करावे.

कंपनीने इशारा दिला आहे की, जर लोकांनी तीन नोटिसा देऊनही प्रतिसाद दिला नाही तर कंपनीला विद्युत कायदा २००३ अंतर्गत त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी लागेल. ज्यामुळे अनधिकृत वीज वापरासाठी पोलीस एफआयआर देखील होऊ शकते. यासाठी अश्या लोकानी शक्य तितक्या लवकर टोरंट ग्राहक कक्षाशी संपर्क साधून नवीन मीटरसाठी अर्ज करावा.

लोकानी हे लक्षात घेतले पाहिजे की, मीटरशिवाय वीज वापरणे ही वीजचोरी आहे, कमी वीज बिलासाठी वीज मीटरमध्ये छेडछाड करणे हा देखील वीजचोरीच प्रकार आहे आणि वीज कायदा २००३ अशा वीजचोरांवर वीज कंपनीकडून कडक कारवाई करण्याची तरतूद आहे. वीज कायदा, २००३ नुसार, वीज चोरी हा कायदेशीर गुन्हा आहे, ज्यासाठी तीन वर्षांपर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

# पाणी बिलासाठी स्मार्ट मीटर बसवण्याचे काम प्रगतीपथावर

**ठाणे :** ठाणेकर नागरिकांकडून विरोध झाल्यानंतर ही आतापर्यंत एक लाख १३ हजार ३२८ स्मार्ट पाणी मीटरपैकी तब्बल ९५ हजार ५५१ इतके बसविण्यात यश आले आहेत. त्यानुसार सर्वांना यंदा स्मार्ट मीटरप्रमाणेच पाणी बील अदा केले जाणार आहे. तसेच उर्वरित १७ हजार ७७७ इतके स्मार्ट मीटर लवकरच बसविले जातील. असे महापालिका सूत्रांनी सांगितले. विशेष म्हणजे सोसायटयांमध्ये १०० टक्के स्मार्ट मीटर बसविण्याचे काम पूर्ण आले असून झोपडपट्टीत मीटर बसविण्यासाठी महापालिकेला कसरत करावी लागणार आहे. तर आतापर्यंत एकूण बसविलेल्या मीटरमध्ये सर्वाधिक २५ हजार ३०१ मीटर कळवा प्रभाग समितीअंर्तगत बसविण्यात आले आहे.

ठाणे महापालिकेच्या माध्यमातून पाणी गळती, पाण्याचा वापर योग्य पध्दतीने व्हावा या उद्देशान शहराच्या विविध भागात स्मार्ट मीटर २०१९ मध्ये बसविण्याचे काम हाती घेण्यात आले. त्यानुसार महापालिका हद्दीत १ लाख १३ हजार ३२८ मीटर बसविले जाणार आहेत. आतापर्यंत ९५ हजार ५५१ मीटर बसविण्यात आले आहेत. त्यानुसार गृहसंकुलांच्या ठिकाणी मीटर बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. त्यानुसार तेथील रहिवाशांना आता मीटर नुसारच बिले पाठविले जात आहेत. मागील वर्षी स्मार्ट मीटरद्वारे ७० हजार ग्राहकांना बिलांचे वाटप करण्यात आले आहे. परंतु आधीच्या आणि आताच्या बिलांमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असल्याची माहिती समोर आली होती. ही देयके अधिक असल्याच्या तक्रारी महापालिकेकडे येऊ लागल्या होत्या. त्यानुसार झोपडपट्टी भागात सध्या हे मीटर बसविण्यात येऊ नये असा सुरही लावण्यात आला होता.

दरम्यान आता झोपडपट्टी भागातच मीटर बसविण्याचे २० टक्के काम शिल्लक असल्याचे पाणी पुरवठा विभागाने सांगितले आहे. त्यानुसार लोकमान्य नगर, कोपरी - आनंद नगर, बाळकुम, वाघबीळ, ओवळा आदींसह इतर काही गावपाड्यांच्या ठिकाणी ही कामे शिल्लक असल्याचेही सांगण्यात आले आहे. आधीचा विरोध पाहता आता या ठिकाणी पुन्हा विरोध वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथेच आता पालिकेला अधिकची कसरत करावी लागणार आहे. दुसरीकडे राबोडी, लोकमान्य सावरकर नगर आणि मुंब्रात मात्र टप्याटप्याने आता मीटर बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. तर कळवा, दिवा भागातही मीटर बसविण्याचे काम सुरु असल्याचा दावा करण्यात आला आहे. जेवढे मीटर बसविण्यात आले आहेत. त्या सर्वांना स्मार्ट मीटर बील अदा करत त्याची वसुली केली जाणार आहे असे सूत्रांकडून सांगण्यात आले.

### बसविलेल्या स्मार्ट मीटरचा तक्ता

| प्रभाग समिती | स्मार्ट मीटर |
|---|---|
| लोकमान्य- सावरकर | ०८६९१ |
| माजीवडा- मानपाडा | १८३६१ |
| नौपाडा- कोपरी | १००७६ |
| उथळसर | ०६९३२ |
| वर्तकनगर | ०७११४ |
| कळवा | २५३०१ |
| वागळे इस्टेट | ११३३८ |
| दिवा | ०४४८५ |
| मुंब्रा | ०३२५३ |
| एकूण | ९५५५१ |

# सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नांना म्हाडाचे बळ - मुख्यमंत्री शिंदे

**ठाणे:** दिवस असो किंवा रात्र, चोवीस तास राबणारे सरकार अशी आमची ओळख आहे.

नागरिकांची कामे त्वरीत व्हावीत आणि त्यांना खेटे मारावे लागू नयेत, यासाठी आम्ही प्रत्येक जिल्ह्यांत मुख्यमंत्री सचिवालये सुरु केली आहेत. शासन आपल्या दारी हा उपक्रम सुरू केला आहे. मंत्रालयात त्रास होऊ नये म्हणून अद्ययावत सेन्ट्रल रजिस्ट्री सुरू केली आहे. या माध्यमातून समाजाभिमुख, लोकाभिमुख कारभार युती सरकार करत असल्याचे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

याचदरम्यान सर्वसामान्यांच्या घरांच्या स्वप्नांना बळ आणि आकार देण्याची जबाबदारी म्हाडा चांगल्या रितीने पेलत आहे. अनेक कुटुंबांचे गृहस्वप्न पूर्ण होण्याचा आजचा दिवस आहे. त्यांच्या स्वप्नपूर्तीच्या आनंदात सहभागी होण्याची संधी मला मिळाली याचा आनंद आहे, अशी भावना बुधवारी मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली.

म्हाडाच्या कोकण मंडळाची ४ हजार ६४० सदनिकांची आणि १४ भूखंडांची संगणकीय लॉटरी बुधवारी ठाण्यातील डॉ काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे काढण्यात आली. या सोडतीचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दुरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील, आमदार किसन कथोरे, किरण सरनाईक, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंग, म्हाडाचे




उपाध्यक्ष अनिल डिग्गीकर, कोकण म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मारोती पवार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, घर म्हणजे म्हाडा हे नाते सामान्यांच्या मनात घट्ट झाले आहे. म्हाडाची गरजूंना घरे देण्याची कार्यप्रणाली कौतुकास्पद आहे. सोडतीला मिळालेला प्रतिसाद पाहिला तर म्हाडावरील विश्वास सिद्ध होतो. आजच्या सोडतीत घर मिळालेल्या लाभार्थ्यांना म्हाडाने लवकरात लवकर घरांचा ताबा द्यावा. जेणेकरून त्यांचा गृहप्रवेश लवकर होऊ शकेल. आपण लवकरच पंतप्रधान आवास योजनेत अत्यल्प उत्पन्न गटासाठी खोणी, शिरढोण, विरार बोळींज, गोठेघर येथे सदनिका देणार आहोत. त्यासाठी केंद्राची मंजुरी मिळाली आहे. केंद्राचे दीड लाख, आणि राज्य शासनाचे एक लाख अनुदान त्यासाठी मिळणार आहे.

यावेळी केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील म्हणाले की, देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रत्येकाला घर या संकल्पनेची पूर्तता करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील आहे, याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. येत्या काळात प्रधानमंत्री आवास योजना आणि म्हाडाच्या माध्यमातून राज्यातील सर्व बेघरांना मिळवून देण्याचे काम महाराष्ट्र शासनाकडून होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमात रिमोटद्वारे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सोडतीचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डिग्गीकर यांनी केले तर आमदार किसन कथोरे यांनी मनोगत व्यक्त केले.